# मेट्रो-३ च्या ताफ्यात ९ ट्रेन येणार; दोन ट्रेन लवकरच मुंबईत दाखल

**मुंबई :** डिसेंम्बर २०२३ अखेर मेट्रोचा पहिल्या टप्प्यातील मार्ग सुरू करण्याचा चंग बांधलेल्या मेट्रो ३ च्या ताफ्यात एकूण नऊ ट्रेन दाखल होणार असून त्यापैकी दोन ट्रेन येत्या काही दिवसात मुंबईत येतील. फआंध्र प्रदेशातील श्री सिटी येथे या ट्रेनची बांधणी होत आहे.मेट्रो ३ ला कोणत्याही परिस्थितीत आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा सुरू करायचा आहे. त्यासाठी कामे वेगाने सुरू आहेत.पहिल्या टप्प्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. बोगद्यांची कामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत.तर स्थानक उभारणी ९७ टक्के पूर्ण झाली आहे.तर ट्रॅक टाकण्याचे काम ७४ टक्के पूर्ण झाले आहे.कारडेपोचे निम्म्यापेक्षा जास्त काम मार्गी लागले आहे.